महाराष्ट्र शासन -कृषी विभाग
विभागीय कृषी सहसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर
चाळीस ठाणा, भगवा चौक, कसबा बावडा, कोल्हापूर-४१६००६
ई -मेल-jdakolhapur@gmail.com दु.क्र.०२३१-२६००२५८

जा.क्र. विकृसस/लेखा-भांडार/शा.वा.नि-७९७५/२४५७ /२०२६ दि.२७/०७ /२०२६

शासकीय स्क्रॅप वाहन खरेदीसाठी लिलाव बोली मागणी पत्र

प्रति,

सर्व इच्छुक/नोंदणीकृत स्क्रॅप विक्रेते,

विषय : शासकीय वाहन क्र. **MH-12-PC-7975** स्क्रॅप स्वरूपात खरेदी करण्यासाठी बंद लिफाफा पद्धतीने लिलाव बोली सादर करण्याबाबत.

या कार्यालयातील खालील शासकीय वाहन अपघातामुळे वापरण्यायोग्य नसलेने, शासकीय वाहन क्र. MH-12-PC-7975 निर्लेखित करुन स्क्रॅप म्हणून लिलावाद्वारे विक्री करण्यात येत आहे. प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांनी सदर वाहनाची नोंदणी रद्द करून निर्लेखन करणेस कळविले आहे. लिलावाद्वारे स्क्रॅप करणेत येणा-या वाहनाचा तपशील खालीलप्रमाणे आहे -

अ. क्र.	वाहन क्रमांक	वाहनाचा प्रकार	उत्पादन वर्ष	स्थिती	राखीव किंमत
1	MH-12-PC-7975	Mahindra Bolero LX	04/2017	अपघातग्रस्त	Rs. 45,600/- (अक्षरी रु.पंचेचाळीस हजार सहाशे मात्र)

तरी इच्छुक स्क्रॅप विक्रेत्यांनी खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून **बंद लिफाफा पद्धतीने** आपली बोली या कार्यालयात दिनांक **३९/०७/२०२६ ते ११/०८/२०२६ पर्यंत सायं. ५.०० वाजेपर्यंत** सादर करावी.

प्राप्त बोली दि. **१२**/०८/२०२६ रोजी दु.१२.०० वाजता या कार्यालयात उघडणेत येईल.

अटी व शर्ती :

१. वाहन **"जैसे आहे, ज्या स्थितीत आहे"** (As is where is basis) या तत्त्वावर स्क्रॅप करण्यासाठी विक्री करण्यात येईल.
२. बोली बंद लिफाफ्यात सादर करावी. लिफाफ्यांवर **"शासकीय स्क्रॅप वाहन खरेदीसाठी लिलाव बोली"** असे स्पष्ट नमूद करावे.
३. प्रत्येक बोलीदाराने रु. ५०००/- (अक्षरी रु. पाच हजार मात्र) इतकी अनामत रक्कम (EMD) Demand Draft द्वारे **लेखाधिकारी, विभागीय कृषी सह संचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर** यांचे नावे जमा करणे बंधनकारक राहील. अनामत रक्कम न भरलेल्या बोली विचारात घेतल्या जाणार नाहीत.
४. इच्छुक बोलीदारांनी वाहनाची प्रत्यक्ष पाहणी कार्यालयीन वेळेत दि. **३९**/०७/२०२६ ते **११**/०८/२०२६ या कालावधीत करावी. अधिक माहितीसाठी कार्यालयीन वेळेत दूरध्वनी क्र. ०२३१-२६००२५८ अथवा भ्रमणध्वनी क्र. ८२७५८७१११० वर संपर्क साधावा.
५. निर्धारित दिनांक व वेळेनंतर प्राप्त झालेल्या बोलींचा कोणत्याही परिस्थितीत विचार करण्यात येणार नाही.

कृ.मा.प.

६. बोली खालीलप्रमाणे **दोन लिफाफा** (Two Cover System) पद्धतीने सादर करावी. -

१. पहिला लेखोटा/ लिफाफा -	१.पॅन कार्डची प्रत २.जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र (लागू असल्यास) ३.वाहन स्क्रॅप व्यवसायाचा वैध परवाना /RVSF नोंदणी प्रमाणपत्र (लागू असल्यास) ४.व्यक्ती/संस्थेचे नाव, संपूर्ण पत्ता, मोबाईल क्रमांक, शॉप ॲक्ट प्रमाणपत्र ५.अनामत रक्कम (EMD) Demand Draft
२. दुसरा लेखोटा/ लिफाफा -	स्वाक्षरीयुक्त बोली/दर पत्र (बोली प्रपत्र सोबत जोडले आहे)

७. बोली राखीव किंमत रु. ४५,६००/- (अक्षरी रुपये पंचेचाळीस हजार सहाशे फक्त) पासून प्रारंभ करण्यात यावी. राखीव किंमतीपेक्षा कमी रकमेच्या बोली स्वीकारल्या जाणार नाहीत.

८. प्रथम पहिला लेखाटा/लिफाफा उघडणेत येईल. ज्या बोलीदाराची वर नमूद कागदपत्रे परिपूर्ण असतील त्या बोलीदाराचा दुसरा लखोटा/लिफाफा उघडणेत येईल.

९. पात्र ठरलेल्या बोलीदारांपैकी सर्वाधिक दर देणाऱ्या बोलीदारास सक्षम प्राधिकाऱ्याच्या मंजुरीनंतर वाहन विक्री करण्यात येईल. वाहन कार्यालयाच्या आवारातून वाहनाची बोली रक्कम कार्यालयात जमा केले नंतर १५ (पंधरा) दिवसाचे आत हटविणे संबंधित खरेदीदारास बंधनकारक राहील.

१०. संपूर्ण विक्री रक्कम **लेखाधिकारी, विभागीय कृषी सहसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर** यांच्या नावे धनाकर्श (Demand Draft) या कार्यालयात जमा केल्यानंतर अथवा चलणाद्वारे योग्य त्या लेखाशिर्षाखाली जमा केल्यानंतरच संबंधित खरेदीदारास वाहनाचा ताबा देण्यात येईल. संपूर्ण बोली रक्कम कार्यालयात जमा करून वाहनाचा ताबा दिला जाईल. बोलीदाराने वाहनाचा ताबा स्वीकारल्यानंतर सदर वाहनासंबंधीची कोणतीही कायदेशीर, नुकसान, आर्थिक अथवा इतर जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही.

११. वाहन सध्या ज्या ठिकाणी आहे तेथून उचलणे, वाहतूक करणे, कटिंग करुन स्क्रॅप करणे तसेच त्यासंबंधीचे इतर सर्व खर्च संबंधित खरेदीदाराने स्वतःच्या जबाबदारीवर व स्वखर्चाने करावयाचे आहेत.

१२. विहित मुदतीत बोलीची रक्कम जमा न केल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व कार्यालयास पुढील पात्र बोलीधारकास वाहन विक्री करण्याचा अधिकार राहील.

१३. वाहनाचा ताबा घेतल्यानंतर खरेदीदाराने प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून (RTO) सदर वाहनाचे वाहन नोंदणी प्रमाणपत्र (Registration Certificate - RC) रद्द करून त्याबाबतचे प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे प्रमाणपत्र ३० (तीस) दिवसांच्या आत या कार्यालयात सादर करणे बंधनकारक राहील.

१४. कोणतेही अथवा सर्व बोली स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार विभागीय कृषी सह संचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचेकडे राखून ठेवण्यात आलेला आहे. सर्व किंवा कोणतीही बोली कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार विभागीय कृषी सह संचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांना राहील.

१५. वाहनाचा वापर सार्वजनिक रस्त्यावर करण्यास परवानगी राहणार नाही. वाहन केवळ स्क्रॅप (भंगार) करणेत यावे.

१६. वाहन स्क्रॅप करताना मोटार वाहन अधिनियम, केंद्रीय मोटार वाहन नियम, तसेच भारत सरकार, महाराष्ट्र शासन आणि प्रादेशिक परिवहन कार्यालय (RTO) यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या सर्व लागू नियम, अधिसूचना व मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे खरेदीदारास बंधनकारक राहील.

(जालिंदर पांगरे)
विभागीय कृषी सह संचालक
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

प्रत- निवड नस्ती
प्रत- कार्यालयीन नोटीस बोर्ड

शासकीय स्क्रॅप वाहन खरेदीसाठी लिलाव बोली मागणी पत्र

शासकीय वाहन क्र. **MH-12-PC-7975** स्क्रॅप स्वरूपात खरेदी करण्यासाठी
बंद लिफाफा पद्धतीने बोली सादर करण्याबाबत.

अ. क्र.	वाहन क्रमांक	वाहनाचा प्रकार	उत्पादन वर्ष	स्थिती	राखीव किंमत
1	MH-12-PC-7975	Mahindra Bolero LX	04/2017	अपघातग्रस्त	Rs. 45,600/- (अक्षरी रु.पंचेचाळीस हजार सहाशे मात्र)

मी/आम्ही वरील नमूद वाहन "जैसे आहे, ज्या स्थितीत आहे" (As is where is basis) या तत्त्वावर, खालीलप्रमाणे खरेदी करण्यासाठी बोली सादर करीत आहे/आहोत. तसेच मा.विभागीय कृषी सह संचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचेकडील पत्र जाक्र. विकृसस/लेखा-भांडार/शा.वा.नि-७९७५/ /२०२६ दि. /०७/२०२६ मधील सर्व अटी व शर्ती मला/आम्हाला मान्य आहेत

मी/आम्ही देत असलेली एकूण बोली रक्कम :

रु._____/-

अक्षरी रुपये :_____ फक्त.

बोलीदारांची स्वाक्षरी व शिक्का